# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र १:– मागील सभेचे दिनांक ८/१२/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :– १ अ                दिनांक:– २५/७/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. महेश सुखरामानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

हे वृक्षप्राधिकरण महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक ८/१२/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ९ पर्यंतचे, इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

एकमताने

पीठासीन अधिकारी
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र २ :– *शॉप नं. 221, स्टेशन रोड, से-20 जवळ, उल्हासनगर-3 या ठिकाणचे जंगली झाडाच्या फांद्या तोडण्यास परवानगी देणे.*

## प्रस्तावना

उपरोक्त विषयानुसार श्री. मनचुडीया पुरुषोत्तम सुगनोमल यांनी त्यांच्या दिनांक ५/२/२०१६ च्या पत्रानुसार शॉप नं. २२१, स्टेशन रोड, से–२० जवळ, उल्हासनगर–३ या ठिकाणी असलेल्या जंगली झाडाच्या फांदया छाटणेकरिता परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१. उक्त झाड छाटणे आवश्यक आहे.
२. भविष्यात वादळी वा–यामुळे झाड पडण्याचे शक्यता नाकारता येत नाही. तरी फक्त फांदया छाटणे आवश्यक वाटते.

सदर झाड छाटण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतलेली नाही.

झाडांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | झाडाचे नाव | बुंध्याचा व्यास | तोडण्यात येणा–या फांदयाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | जंगली झाड | ५' फुट | उंची २५ 'फुट, मुख्य फांदया २, जाडी १.५ ते २' |

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाडाच्या फांदया छाटणेकरीता मा. वृक्ष प्राधिकरणासमोर निर्णयासाठी प्रस्तावित आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :– २ दिनांकः– २५/७/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. महेश सुखरामानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. मनचुडिया पुरुषोत्तम सुगनोमल यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून शॉप नं. २२१, स्टेशन रोड, से–२० जवळ, उल्हासनगर–३ या ठिकाणी असलेल्या जंगली झाडाच्या फांदया तोडण्यास परवानगी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र ३ :–** बॅरेक नं. 1397, रुम नं. 8, मराठा सेक्शन 32, उल्हासनगर-4 या ठिकाणचे जांभळाचे झाड तोडण्यास परवानगी देणे.

## प्रस्तावना

उपरोक्त विषयाबाबत श्री. राजू गुरप यांनी त्यांच्या दिनांक २१/१०/२०१५ च्या पत्रानुसार बॅरेक नं. १३९७, रुम नं. ८, मराठा सेक्शन ३२, उल्हासनगर–४ या ठिकाणी असलेल्या जांभळाचे झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

जांभुळ जातीच्या झाडाच्या फांदया व मुळे मागील भिंतीच्या लगत वाढलेल्या असल्याने भिंतीला तडे पडलेले असून भविष्यात सदरची भिंत धोकादायक होवून पडण्याची शक्यता आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाडांच्या फांदया छाटण्याकरीताकरीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

**वृक्षप्राधिकरण ठराव क्र :–** ३ **दिनांक:–** २५/७/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. महेश सुखरामानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. राजू गूरप यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून बॅरेक नं. १३९७, रुम नं. ८, मराठा सेक्शन ३२, उल्हासनगर–४ या ठिकाणी असलेले जांभुळ जातीचे झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीचे पाच नविन झाडे ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र ४ :— *ब्लॉक नं. 297 च्या मागे, नालंदा शाळेजवळ, उल्हासनगर-4 या ठिकाणचे चिंचेच्या झाडाच्या फांदया व जांभळाचे झाड तोडण्यास परवानगी देणे.*

## प्रस्तावना

उपरोक्त विषयाबाबत श्री. प्रशांत भानुदास चंदनशिवे यांनी त्यांच्या दिनांक २६/८/२०१६ च्या पत्रानुसार ब्लॉक नं. २९७ च्या मागे, नालंदा शाळेजवळ, उल्हासनगर—४ या ठिकाणी घराच्या समोरील चिंचेच्या झाडाच्या फांदया तोडण्यासाठी व जांभळाचे झाड तोडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१. अर्जदार यांच्या घरासमोर अंदाजे १ फुट रुंदी बुंदा असलेले जीवंत जांभुळ या जातीचे झाड आहे ते झाड एका बाजुला झुकलेले आहे व वादळी पावसामुळे ते केव्हाही कोसळून जीवीत व वित्त हानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरचे झाड तोडणे आवश्यक आहे.
२. त्याच्या बाजुला १ फुट रुंद बुंदा असलेले जीवंत चिंचेचे झाड आहे, व त्याच्या फांदया अर्जदाराच्या घरावर व लाईटच्या पोलच्या तारेजवळ पसरलेले आहे, वादळ व पावसामुळे विद्युत तारेला स्पर्श होवुन अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्याच्या फांदया छाटणे आवश्यक आहे.

सदरचे चिंचेच्या झाडाच्या फांदया तोडण्यासाठी व जांभळाचे झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात देवूनही हरकती मागविण्यात आल्या होत्या. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतलेली नाही.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र अॅक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :— ४ दिनांक:— २५/७/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. महेश सुखरामानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. प्रशांत भानुदास चंदनशिवे यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका—याच्या अहवालावरून ब्लॉक नं. २९७ च्या मागे, नालंदा शाळेजवळ, उल्हासनगर—४ या ठिकाणी असलेल्या चिंचेच्या झाडाच्या फांदया तोडण्यास आणि जांभळाचे झाड तोडणेस परवानगी देत आहे व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीचे पाच नविन झाडे ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र ५ :— ब्लॉक नं. ए/67/397, गोल मैदान, उल्हासनगर-1 या ठिकाणचे आंब्याच्या झाडाच्या फांदया तोडण्यास परवानगी देणे.

### प्रस्तावना

उपरोक्त विषयाबाबत श्री. सतिश भाटिया यांनी त्यांच्या दिनांक १३/६/२०१६ च्या पत्रानुसार ब्लॉक नं. ए/६७/३९७, गोल मैदान, उल्हासनगर—१ या ठिकाणी असलेल्या आंब्याचे झाड तोडण्यास परवानगी मागितलेली आहे. उक्त झाड खालील कारणामुळे तोडणे आवश्यक आहे.

१. सदर झाड एमएसईबीच्या विदयुत वाहिनीवर झुकलेले आहे. विदयुत वाहिनीला स्पर्श करत असून विदयुत वाहिनीतील करंट झाडात उतरुन जिवित व वित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
२. सदर जागेवर विकास काम करण्याकरीता नगररचना विभागाकडून बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र परवानगी घेतली आहे. तरी उक्त झाड तोडणे आवश्यक आहे.

सदर झाड तोडण्यासाठी वृत्तपत्रात जाहीराती देवून हरकती मागविण्यात आलेली होती. परंतु कुठल्याही इसमाने हरकत घेतलेली नाही.

झाडांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | झाडाचे नाव | बुंध्याचा व्यास | तोडण्यात येणा—या फांदयाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | आंबा जातीचे झाड | २' फुट | उंची ३० 'फूट |

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र ॲक्ट XLIV १९७५ सुधारित केलेल्या आवृत्तिमधील व मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. १ व २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार वृक्ष अधिकारी यांनी उक्त ठिकाणच्या झाडाची पहाणी केल्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या कारणामुळे सदर झाड तोडण्या करीता मा. वृक्ष प्राधिकरणाकडुन मंजुरी करीता प्रस्तावित आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :— ४ अ दिनांक:—२५/७/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. चंद्रशेखर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. सतिश भाटिया यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका—याच्या अहवालावरून ब्लॉक नं. ए/६७/३९७, गोल मैदान, उल्हासनगर—१ या ठिकाणी असलेल्या आंब्याच्या झाडाच्या फांदया तोडण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

### कारण

सदरचा सुधारीत गोषवारा आणणे आवश्यक आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र ६ :– गणेश नगर, सेक्शन-39, भाटिया रोड, उल्हासनगर- 5 या ठिकाणचे उंबराच्या झाडाच्या फांदया तोडण्यास परवानगी देणे.

## प्रस्तावना

श्री. मुकेश बाबु आव्हाड व इतर रहिवासी यांनी दिनांक ०३/०४/२०१७ रोजीच्या अर्जान्वये गणेश नगर, सेक्शन–३९,भाटिया रोड, उल्हासनगर– ५ येथील उंबराच्या झाडाच्या फांदया छाटणेसाठी परवानगी अर्ज सादर केला होता. सदर ठिकाणी पाहणी केली असता खाली नमुद केलेल्या कारणांमुळे झाडाच्या फांदया छाटणे आवश्यक आहे.

१) उंबर या जातीच्या झाडाच्या फांदया बाजुच्या घरावर पसरलेल्या आहेत तसेच विद्युत तारेच्या जवळ वाढलेल्या आहेत.

२) वादळ वाऱ्यामुळे सदरच्या फांदया विद्युत तारेला स्पर्श होऊन तसेच बाजुच्या घरावर तुटुन पडुन जिवीत व वित्तहानी होण्याची शक्यता आहे.

सदर ठिकाणी असलेल्या झाडाच्या फांदयां छाटण्यासाठी कोणाची हरकत असल्यास सादर करणेसाठी वृक्षावर नोटीस लावण्यात आली होती. तसेच दि. ०६/०५/२०१७ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर सूचना देखिल प्रसिध्द् करण्यात आली होती. तथापि सदर झाडाच्या फांदया छाटणेबाबत कोणाचीही हरकत या कार्यालयात प्राप्त झालेली नाही.

झाडांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अनु क्र | झाडाचे नाव | बुंध्याचा व्यास | तोडण्यात येणाऱ्या फांदयाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | उंबर | १ फुट ६ इंच | अंदाजे ६ इंच रूंद व अंदाजे १५ फुट लांब अशा एकूण ६ फांदया |

तरी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम महाराष्ट्र अक्ट XLIV १९७५ पर्यंत सुधारीत केलेली आवृत्ती व वृक्ष प्राधिकरण ठराव क्र. १ ते २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार सदर ठिकाणी असलेल्या झाडाच्या फांदया छाटणेसाठी मंजुरी मिळणेकामी मा. वृक्ष प्राधिकरणाकडे प्रस्तावित करण्यात येत आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :–५ दिनांक:–२५/७/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. मुकेश बाबु आव्हाड व इतर रहिवासी यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिकाऱ्याच्या अहवालावरून गणेश नगर, सेक्शन–३९,भाटिया रोड, उल्हासनगर– ५ या ठिकाणी असलेल्या उंबराच्या झाडाच्या फांदया तोडण्यास परवानगी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र ७ :– ब्लॉक नं ए 147, रूम नं 293, कुर्ला कॅम्प रोड, उल्हासनगर- 5 या ठिकाणचे आंब्याच्या झाडाच्या फांदया तोडण्यास परवानगी देणे.

### प्रस्तावना

श्री. रमेश परमानंद मनकानी यांनी दिनांक ०९/०२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये ब्लॉक नं ए १४७, रूम नं २९३, कुर्ला कॅम्प रोड, उल्हासनगर– ४ येथील आंब्याच्या झाडाच्या फांदया छाटणेसाठी परवानगी अर्ज सादर केला होता. सदर ठिकाणी पाहणी केली असता खाली नमुद केलेल्या कारणांमुळे झाडाच्या फांदया छाटणे आवश्यक आहे.

१) झाडाची एक फांदी त्यांच्या लगतच्या ब्लॉकच्या पत्र्यावर पुर्णपणे पसरलेली आहे.

२) वादळ वाऱ्यामुळे सदरची फांदी तुटुन शेजारच्या घराच्या पत्र्याचे नुकसान होत आहे.

सदर ठिकाणी असलेल्या झाडाची फांदी छाटण्यासाठी कोणाची हरकत असल्यास सादर करणेसाठी वृक्षावर नोटीस लावण्यात आली होती. तसेच दि. ०६/०५/२०१७ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर सूचना देखिल प्रसिध्द् करण्यात आली होती. तथापि सदर झाडाच्या फांदया छाटणेबाबत कोणाचीही हरकत या कार्यालयात प्राप्त झालेली नाही.

झाडांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अनु क्र | झाडाचे नाव | बुंध्याचा व्यास | तोडण्यात येणाऱ्या फांदयाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | आंबा | २ फुट रूंद | अंदाजे १ फुट रूंद व अंदाजे १५ फुट लांब |

तरी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम महाराष्ट्र अक्ट ग्स्ट १९७५ पर्यंत सुधारीत केलेली आवृत्ती व वृक्ष प्राधिकरण ठराव क्र. १ ते २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार सदर ठिकाणी असलेल्या झाडाची फांदी छाटणेसाठी मंजुरी मिळणेकामी मा. वृक्ष प्राधिकरणाकडे प्रस्तावित करण्यात येत आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :– ६ दिनांक:– २५/७/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. महेश सुखरामानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. रमेश परमानंद मनकानी यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून ब्लॉक नं ए १४७, रूम नं २९३, कुर्ला कॅम्प रोड, उल्हासनगर– ४ या ठिकाणी असलेल्या आंब्याच्या झाडाच्या फांदया तोडण्यास परवानगी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र ८ :– *महात्मा ज्योतीबा फुले (माध्य.) विद्यालय, बॅ.नं.2086 च्या मागे, सेक्शन -35, उल्हासनगर - 5 या ठिकाणचे जंगली जातीचे झाड तोडण्यास परवानगी देणे.*

## प्रस्तावना

मुख्याध्यापक, महात्मा ज्योतीबा फुले (माध्य.) विद्यालय यांनी दि. २४/०४/२०१७ रोजीच्या अर्जान्वये बॅ.नं. २०८६ च्या मागे, सेक्शन–३५, उल्हासनगर–५ येथील जंगली जातीचे झाड तोडण्यासाठी परवानगी अर्ज सादर केला होता. सदर ठिकाणी पाहणी केली असता खाली नमुद केलेल्या कारणामुळे झाड तोडणे आवश्यक आहे.

**१) सदर जंगली जातीच्या झाडाच्या फांदया शाळेच्या कार्यालयाच्या पत्र्यावर पसरलेल्या आहेत.**

**२) सदरच्या झाडाला किड लागल्यामुळे ते वादळ वाऱ्यामुळे शाळेवर तुटून पडून जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता आहे.**

सदर ठिकाणी असलेले जंगली झाड तोडण्यासाठी कोणाची हरकत असल्यास सादर करणेसाठी वृक्षावर नोटीस लावण्यात आली होती. तसेच दि. ३०/०४/२०१७ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देखिल प्रसिध्द् करण्यात आली होती. तथापि सदर झाडाच्या फांदया तोडण्याबाबत कोणाचीही हरकत या कार्यालयात प्राप्त झालेली नाही.

**झाडांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

| अनु क्र | झाडाचे नाव | बुंध्याचा व्यास | तोडण्यात येणाऱ्या फांदयाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | जंगली जातीचे झाड | २'६'' रूंद बुंधा | मुळासकट संपुर्ण झाड |

तरी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम महाराष्ट्र अक्ट XLIV १९७५ पर्यंत सुधारीत केलेली आवृत्ती व वृक्ष प्राधिकरण ठराव क्र. १ ते २ मधील मार्गदर्शक तत्वानुसार सदर ठिकाणी असलेले झाड तोडणेची मंजुरी मिळणेकामी मा. वृक्ष प्राधिकरणाकडे प्रस्तावित करण्यात येत आहे.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :–७ दिनांक:– २५/७/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. महेश सुखरामानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मुख्याध्यापक, महात्मा ज्योतीबा फुले (माध्य.) विद्यालय यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून बॅ.नं. २०८६ च्या मागे, सेक्शन–३५, उल्हासनगर–५ या ठिकाणी असलेले जंगली जातीचे झाड तोडणेस परवानगी देत आहे. व त्या जागी किंवा त्याचे सभोवतालचे परिसरात इष्ट त्या जातीचे पाच नविन झाडे ३० दिवसाचे आत लावणे व त्याचे जतनाची पूर्तता करण्याकामी वृक्ष अधिकारी योग्य ती कार्यवाही करतील असे त्यांना निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

आयत्यावेळचा विषय

विषय क्र ९ :– *उल्हासनगर पोलिस स्टेशन परिसरातील उल्हासनगर-1 या ठिकाणच्या झाडांची छाटणी करण्यास परवानगी देणे.*

## प्रस्तावना

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, उल्हासनगर पोलिस ठाणे यांचेकडील दिनांक १६/५/२०१७ रोजीच्या अर्जानुसार उल्हासनगर पोलिस स्टेशन परिसरात अनेक लहान मोठी झाडे आहेत. सदर झाडांच्या फांदया पोलिस स्टेशनचे छतावर विस्तारलेल्या असुन त्या वाकलेली आहेत. आगामी पावसाळयाचे अनुषंगाने पाऊस व वा–यामुळे सदर फांदया पोलिस स्टेशनचे छतावर पडुन नुकसान होण्याची शक्यता आहे.

सदर झाडांच्या फांदयाच्या रस्त्याचे कडेला असणारे विदयुत पोलवरील विदयुत वायरला स्पर्श होत असल्याने पावसाळयात झाडांमध्ये विदयुत करंट उतरुन नागरीकांना शॉक लागण्याची शक्यता आहे.

करीता आगामी पावसाळयापुर्वी उल्हासनगर पोलिस स्टेशन परिसरातील झाडांच्या फांदयाची छाटणी होणेस विनंती.

वृक्षप्राधिकरण ठराव क्र :– ८ दिनांक:– २५/७/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. चंद्रशेखर यादव

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

हे वृक्षप्राधिकरण वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांच्या अर्जावरून व वृक्ष अधिका–याच्या अहवालावरून उल्हासनगर पोलिस स्टेशन परिसरातील उल्हासनगर–१ या ठिकाणच्या झाडांच्या फांदयाची छाटणी करण्यास परवानगी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

आयुक्त /सभापती
वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका